# केंद्रीय मंत्रिमंडळाने वाढवण रस्त्याला दिली मंजुरी; एन एच 48 (NH 48) (तवा जंक्शन) ते वाढवण बंदरापर्यंत राष्ट्रीय महामार्गाची घोषणा

**मुंबई,13 ऑगस्ट, 2024:** केंद्रीय मंत्रिमंडळाने एन.एच. 48 पासून सुमारे 32 किमी लांबीच्या वाढवण बंदरापर्यंतच्या जोड रस्त्याला मंजुरी दिली आहे आणि संबंधित निर्णय घेण्यासाठी माननीय मंत्री, रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्रालय यांना या संदर्भात योग्य ते निर्णय घेण्याचे सर्वाधिकार देण्यात आले आहेत. भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरणाच्या भूसंपादन समितीने संरेखन मंजूर केले आहे. रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्रालयाने या रस्त्यास राष्ट्रीय महामार्ग म्हणून घोषित केल्यानंतर जमीन संपादनासाठी अधिसूचना लागू होईल. भारत सरकारने 12 ऑगस्ट 2024 रोजी गॅजेट नोटिफिकेशन काढून एन.एच. 48 (तवा जंक्शन) ते वाढवण बंदरापर्यंतच्या रस्त्यास राष्ट्रीय महामार्ग म्हणून घोषित केले आहे.

वाढवण बंदराच्या महत्त्वाच्या विकासाबाबत जनेप प्राधिकरणाचे अध्यक्ष मा. श्री उन्मेष शरद वाघ (भा.रा.से.) म्हणाले, “वाढवण बंदरातील काम सुरू करण्यासाठी रस्त्याचे बांधकाम करणे आवश्यक आहे. बंदरापर्यंत उत्खनन सामग्रीची वाहतूक करण्यासाठी हा महामार्ग आवश्यक आहे, कारण अशा अवजड वाहतुकीसाठी स्थानिक रस्ते खूपच अरुंद आहेत. रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्रालयाने या रस्त्याला राष्ट्रीय महामार्ग म्हणून घोषित केल्यामुळे या प्रक्रियेला विलक्षण गती मिळेल.”

ते पुढे म्हणाले, “एकदा राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरणाने 3(A) अधिसूचना जारी केल्यानंतर, भूसंपादन प्रक्रिया त्वरित सुरू होईल. त्याच बरोबर, साहित्य वाहतूक सुलभ करण्यासाठी प्राधिकरण अंदाजे 20 किमी लांबीच्या दोन-लेन रस्त्याच्या बांधकामासाठी निविदा मागवेल. हा रस्ता देखील वाढवण बंदराच्या कनेक्टिव्हिटीचाच एक भाग असेल तसेच आवश्यकतेनुसार या रस्त्याचा विस्तार करण्याची योजना आहे.”

केंद्रीय मंत्रिमंडळाने जून 2024 मध्ये वाढवण बंदर प्रकल्पाला मंजुरी दिल्यानंतर, वाढवण किनारपट्टीच्या ऑफशोअर भागात बांधकाम, ड्रेजिंग आणि पुनर्वसनाद्वारे तयार केल्या जाणाऱ्या जमिनीचा विकास आणि देखभाल करण्यासाठी अभिरुची पत्र (EOI) मागविले असून अनेक प्रमुख संस्थांनी यात स्वारस्य दाखवले आहे.

या महामार्गाचे काम पूर्णत्वास गेल्यानंतर साधारण पुढील पावसाळ्यानंतर बंदराचे बांधकाम सुरू होणे अपेक्षित आहे.

**जनेप प्राधिकरण बद्दल:**

जवाहरलाल नेहरू पोर्ट प्राधिकरण (जनेप प्राधिकरण) हे भारतातील प्रमुख कंटेनर हाताळणी बंदरांपैकी एक आहे. २६ मे १९८९ रोजी स्थापना झाल्यापासून, जनेप प्राधिकरण एक बल्क कार्गो टर्मिनलवरून देशातील प्रमुख कंटेनर बंदरात रूपांतरित झाले आहे.

सध्या, जनेप प्राधिकरण पाच कंटेनर टर्मिनल्स चालवते - एन एस एफ टी , एन एस आय सी टी, एन एस आय जी टी, बी एम सी टी आणि ए पी एम टी बंदरात सामान्य मालवाहतुकीसाठी उथळ पाण्याचा बर्थ देखील आहे. जनेप प्राधिकरण पोर्टवर उपस्थित असलेले लिक्विड कार्गो टर्मिनल बीपीसीएल-आयओसीएल कन्सोर्टियमद्वारे व्यवस्थापित केले जाते. याव्यतिरिक्त, नव्याने बांधलेला किनारी धक्का इतर भारतीय बंदरांना जोडतो आणि किनारपट्टीवरील कंटेनरची वाहतूक वाढवते.

277 हेक्टर जमिनीवर वसलेले, जनेप प्राधिकरण भारतातील निर्यात-केंद्रित उद्योगांना चालना देण्यासाठी, अत्याधुनिक पायाभूत सुविधांसह, काळजीपूर्वक डिझाइन केलेले बहुउत्पादक विशेष आर्थिक क्षेत्र (SEZ) देखील चालवते.

जनेप प्राधिकरण महाराष्ट्रातील वाढवण येथे सर्व हवामानात काम करण्यायोग्य, २० मीटर नैसर्गिक खोल, ग्रीनफिल्ड पोर्ट विकसित करत आहे. हे जागतिक स्तरावरील सर्वोत्कृष्ठ १० बंदरांमध्ये स्थान मिळवणार आहे आणि स्थापनेपासून १००% हरित बंदर असेल.

**मीडिया चौकशीसाठी, कृपया संपर्क साधा:**

**जनेप प्राधिकरण:**

अंबिका सिंग

सीनियर मॅनेजर (मार्केटिंग), जनेप प्राधिकरण

मोबाईल क्रमांक: +919920372677

ईमेल: ambika singh@jnport.gov.in

**Union Cabinet Approves Road Connectivity for Vadhvan Port; Declaration of National Highway from NH 48 (Tawa Junction) to Vadhvan Port**

**Mumbai, August 13, 2024:** The Union Cabinet has approved the road connectivity for Vadhvan Port from NH 48 of about 32 KM and authorized the Hon'ble Minister of MoRTH to make the relevant decision. The NHAI LAC has approved the alignment for the road connectivity, and notification for the acquisition will commence after MORTH declares the road as National Highway (NH).The Gazette Notification of Govt of India has issued a declaration of National Highway from NH 48 (Tawa Junction) to Vadhvan Port on 12th August 2024.

Regarding the crucial development of Vadhvan Port, Shri Unmesh Sharad Wagh, IRS, Chairman of JNPA, stated, "The construction of the road is a critical activity necessary to initiate the work at Vadhvan Port. It is essential for transporting quarry material from the sites to the port, as the local roads are too narrow for such heavy transportation. The declaration by the Ministry of Road Transport and Highways (MoRTH) to designate this road as a National Highway will expedite the process significantly."

He further added, "Once the 3(A) notification is issued by NHAI, land acquisition will commence immediately. Simultaneously, NHAI will invite tenders for the construction of an initial two-lane road, approximately 20 KM long, to facilitate material transport. This road will be part of the dedicated connectivity to Vadhvan, with plans to extend it as required for full road connectivity to the port."

The Union Cabinet approved the Vadhvan Port Project in June 2024 and later JNPA invited Expressions of Interest (EoI) for the development and maintenance of land to be created in offshore of Vadhvan Coast by dredging, reclamation and construction of an offshore protection bund for Vadhvan Port on PPP (HAM & Annuity Model) which garnered interest from several leading organisations.

Construction of the port is expected to commence after the next monsoon, once the road connectivity is established.

**About JNPA:**

The Jawaharlal Nehru Port Authority (JNPA) is one of the premier container-handling ports in India. Since its inception on May 26, 1989, JNPA has transformed from a bulk cargo terminal into the premier container port in the country.

Currently, JNPA operates five container terminals - NSFT, NSICT, NSIGT, BMCT and APMT. The Port also has a Shallow Water Berth for general cargo. A Liquid Cargo Terminal present at the JNPA Port is managed by the BPCL-IOCL consortium. Additionally, the newly constructed coastal berth links other Indian ports and facilitates enhancing the traffic of coastal containers.

Nestled across 277 hectares of land, JNPA also operates a meticulously designed multi-product SEZ, with state-of-the-art infrastructure, to boost export-oriented industries in India.

JNPA is also developing an all-weather, deep-draft, greenfield port at Vadhvan, in Maharashtra. It is poised to be among the top 10 ports globally and will be 100% green port since its inception.

**For media enquiries, please contact:**

JNPA:
Ambika Singh
Sr. Manager (Marketing), JNPA
Mob: +919920372677
E-mail: ambikasingh@jnport.gov.in